# मान्सून पुर्वतयारी- २०१७

# करावयाच्या

# पुर प्रतिबंधक उपाययोजना

# जिल्हा य व त मा ळ

# आपत्ती निवारण योजना यवतमाळ जिल्हा

यवतमाळ जिल्हयांत पैनगंगा, वर्धा, अरुणावती, बेंबळा, निगुर्डा, अडान, चक्रावती, धावंडा,खुनी, व पुस हया, अशा एकुण १० नद्या प्रामुख्याने मोठया आहेत. या शिवाय लहान नद्या व नाले (१) रामगंगा (२) कमळवेली (३) पाटण (४) डेहणी (५) जवळा (६) मनपूर (७) महागांव (८) लोणी (९) चिकणी, असे एकुण ९ असुन पावसाचे अतिवृष्टीमुळे बऱ्याच नद्या नाल्यांना पुर येऊन, नदी काठच्या गावांना, पुराचा तडाखा बसतो. जिल्हयाचे दक्षिणेकडील व पुर्वेकडील मोठया नद्या लगतचा भाग हा घनदाट जंगलाने व्यापलेला प्रदेश आहे.

## जिल्हयातील मोठी धरण

(१) पुस, (इसापूर, नांदेड यवतमाळ संयुक्त) (२) अरुणावती (३)बेंबळा

| अतिवृष्टीचे पुरामुळे बाधित होणारी एकुण गांवे | मोठया नद्यांची एकुण संख्या | मोठया नद्यांमुळे बाधित होणारी गांवे | लहान नद्या व नाल्यांची संख्या | लहान नद्या व नाल्यामुळे बाधित होणाऱ्या गावांची संख्या | नदी काठावरील अतिसंवेदनशिल व संवेदनशिल गावांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अतिसंवेदनशिल | संवेदनशिल |
| १५६ | १० | २१ | ९ | ९ | २४ | १३२ |

## १) जिल्हयात पुरपरिस्थिती उद्‌भवण्याची सर्वसाधारण कारणे..

- नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यास
- मोठया व मध्यम प्रकल्पामधून पाणी सोडल्यास किंवा तलाव पुर्ण भरल्यामुळे सांडव्यातून पाणी सुटल्यांस
- नदी व नाले, कालवा यांचे पात्रामध्ये कचरा, झाडे, बेशरम वनस्पती, इत्यादी अडथळयामुळे पाणी तुंबल्यामुळे
- पर्वतीय क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यास
- मोठया नद्या पुर्ण क्षमतेने भरुन वाहील्यास त्याला मिळणाऱ्या उपनद्यांतील पाणी तुंबल्यामुळे जुने झालेले सर्व प्रकारचे तलाव कमकुवतपणामुळे फुटल्यास किंवा दुरुस्ती न झाल्याने अचानक फुटल्यास

## २) पुर नियंत्रणाकरिता स्वयंचलीत संगणक प्रणाली.. ...

जिल्हयातील मोठया प्रकल्पाच्या सांडव्यावर द्वार प्रचलनासाठी स्वयंचलीत संगणक प्रणाली बसविण्यांत आली आहे. त्याद्वारे पुरनियंत्रण केल्या जाते. पावसाळयाचे कालावधीत मोठया प्रकल्पाचे ठिकाणी २४ तासाकरिता सहाय्यक अभियंता व इतर ४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांत येईल.

## ३) पुरपरिस्थिती हाताळण्यासाठी रचनात्मक उपाययोजना .. ...

- मोठे व मध्यम तसेच जिल्हयातील सर्वच प्रकल्पाची तातडीने दुरुस्ती करणे.
- प्रकल्पाच्या दरवाज्यांची दुरुस्ती.
- नैसर्गीक पाणीसाठे, प्रकल्पाचे कालवे व सांडव्यांची दुरुस्ती.
- दोन मोठया प्रकल्पामध्ये समन्वय साधन्यासाठी बिनतारी यंत्रणा स्थापीत करणे.

## ४) लोकांमध्यजनजागृती बाबत उपाययोजना .. ...

पुरपरिस्थिती मध्ये काय करावे व काय करु नये, याबाबत उपाययोजनांची जाणीव करुन देण्याकरिता संभाव्य पुरग्रस्त गावांतील स्थनिक लोकप्रतीनिधी, सेवाभावी, सामाजिक संस्था व स्थानिक कर्मचारी / नागरीक यांना प्रशिक्षण द्यावे व स्थानिक प्रसिध्दी माध्यमाद्वारे / गांवात मुनादीने दवंडी देवून सर्व स्तरावर माहीती पोहचेल याबाबत दक्षता घेण्यांत यावी. तसेच ग्रामपंचायत, तात्काळ मदत देणारे नागरीक यांचे दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करुन ठेवल्यास आपत्तीचे प्रसंगी त्यांचेशी संपर्क ठेऊन आवश्यक असलेली मदत देण्यास सोईचे होईल.

## ५) जिल्हा व तालुका स्तरावर तात्काळ करावयाच्या उपाययोजना .. ...

- जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावर पुरनियंत्रण समितीच्या बैठकी घेणे.
- जिल्हा व तालुकास्तरावर सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व सेवाभावी संस्थेसोबत समन्वय ठेवणे, (मदत घेण्याकरिता संबंधित सेवाभावी संस्थांचे पत्ते, फोन,भ्रमणध्वनी उपलब्ध करुन ठेवणे) व संपर्क यंत्रणा सक्षम करणे. नियंत्रण समितीच्या बैठका घेणे.
- पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अतिसंवेदनशील / संवेदनशील गावांचे, ग्रामपंचायतीचे, नियंत्रण कक्ष अद्यावत करणे, व प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.
- गांवागावांत बचाव पथके प्रशिक्षीत करणे, होडी / यांत्रीक बोटी, पोहणारे, इ. स्थानिक साधनसामुग्रीची उपलब्धता तपासणे, तसेच १ जुन पूर्वी, पुरबाधित गावांत कार्याची रंगीत तालीम घेणे. उपलब्ध साधनसामुग्रीद्वारे पुरात अडकलेल्यांना सुरक्षित स्थळी पोहचविण्याचे कार्य करणे. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करणे.
- अतिदुर्गम भागातील पोलीस बिनतारी यंत्रणा कार्यान्वीत ठेऊन, व सतत संपर्कात राहून तलाठी, पोलीस पाटील, सरपंच यांचेकडून प्राप्त होणारी माहीती तालुका तसेच जिल्हयाचे ठिकाणी तातडीने बिनतारी यंत्रणेद्वारे (वायरलेस) उपलब्ध करुन देणे.

# नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रमांक

| अनु. क्रमांक | विभाग / प्रकल्पाचे नाव | दुरध्वणी क्रमाक् |
|---|---|---|
| 1 | जिल्हा नियंत्रण कक्ष ( टोल फ्री क्रमांक१०७७ ) | ०७२३२ - २५५०७७ / २४०७२० |
| 2 | विभागिय नियंत्रण कक्ष | ०७२१ – २६६१३६४ / २६६२७८२ |
| 3 | मंत्रालय नियंत्रण कक्ष | ०२२ – २२०२७९९० |
| 4 | एन. डी. आर. एफ. पुणे | ०२११ – ४२३२५०९ |
| 5 | अग्णिशामक दल यवतमाळ | ०७२३२ – २४४२६५ |
| 6 | पोलिस नियंत्रण कक्ष | ०७२३२ – २५६७०० |
| 7 | विद्युत मंडळ | ०७२३२ – २४२३१८ |
| 8 | अरूणावती प्रकल्प दिग्रस | ०७२३४ – २२२०९६ |
| 9 | अडाण प्रकल्प | ०७२३८ -२५४२६०<br>०७२५६ -२०१२३५ |
| 10 | पुस प्रकल्प  ता. दिग्रस | ०७२३३ – २४९४०५<br>०७२३६ – २४१४४८ |
| 11 | निम्न वर्धा प्रकल्प | श्री. बुटले – ९५६१४७६१३४ |
| 12 | अधरपुस प्रकल्प ता. महागाव | ०७२३३ – २४९४०५ |
| 13 | बेंबळा प्रकल्प ता. बाभुळगाव | ०७२०३ -२०२६१५ |
| 14 | गोकि प्रकल्प ता. दिग्रस | ०७२३२ – २४२३७५ |
| 15 | सायखेडा प्रकल्प ता. दिग्रस | ०७२३२ – २४२३७५ |
| 16 | वाघाडी प्रकल्प ता. दिग्रस | ०७२३२ – २४२३७५ |
| 17 | बोरगांव प्रकल्प ता. दिग्रस | ०७२३२ – २४२३७५ |
| 18 | नवरगाव प्रकल्प ता. मारेगाव | ०७२३३ – २४६०५२ |
| 19 | उर्ध्व पैनगंगा प्रकल्प नांदेड | ०२४६२ – २६०८२० |

## जिल्हाधिकारी,उपजिल्हाधिकारी, उ.वि.अधिकारी यांचे दुरध्वनी/भ्रमणध्वनी

| अ. क्रमांक | नावं | पदनाम | एसटीडी | दुरध्वनी | | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यालय | निवास | |
| 1 | श्री.सचिन्द्र प्रताप सिंह | जिल्हाधिकारी | ०७२३२ | २४२५०१ | २४२३०१ | ९४२२८८५५११ |
| 2 | श्री.एल.बी.राऊत | अपर जिल्हाधिकारी | ०७२३२ | २४२३८३ | २४५४६२ | ८८८८३७००३ |
| 3 | श्री.राजेश खवले | निवासी उपजिल्हाधिकारी | ०७२३२ | २४२४८८ | २४४२५० | ९४२२९१७०११ |
| 4 | श्री. भराडी | जिल्हा पुरवठा अधिकारी | ०७२३२ | २४२२४६ | २४४४१४ | ९८५०४४०४११<br>९४२२९१७०१६ |
| 5 | श्री. चंद्रकांत जाजु | जिल्हा पुनर्वसन अधिकारी | ०७२३२ | २४४७७९ | - | ९७६६६९१११८ |
| 6 | श्री. जी.एस.पवार | जिल्हा प्रकल्प अधिकारी, न.पा.प्र | ०७२३२ | २४०८३१ | - | ९९२३१५३२३१ |
| 7 | श्री.स्वप्नील तांगडे | उ.वि.अधिकारी यवतमाळ | ०७२३२ | २४४२३७ | २४२४६२ | ९४२२९१७०१८ |
| 8 | श्री. जयंत देशपांडे | उ.वि.अधिकारी दारव्हा | ०७२३८ | २५४१६२ | २५४२६३ | ९४२२९१७०१९ |
| 9 | श्री. खेडेकर | उ.वि.अधिकारी पांढरकवडा | ०७२३५ | २२७५३० | २२७४४० | ९४२२९१७०२२ |
| 10 | श्री.नितीन कुमार हिंगोले | उ.वि.अधिकारी पुसद | ०७२३३ | २४६०७४ | २४६०७३ | ८२७५०३६९९९ |
| 11 | श्री.एस.एन. मिश्रा | उ.वि.अधिकारी वणी | ०७२३९ | २२५३५६ | २२५०२६ | ९४२२९१७०२३ |
| 12 | श्री.संदीप कुमार अपार | उ.वि.अ.राळेगांव | ०७२०२ | २२५१४० | - | ९६०४३९५१३० |
| 13 | श्री. स्वप्नील कापडनिस | उ.वि.अ.उमरखेड | ०७२३१ | २३७२३८ | - | ९४२२९२१६२२ |

# तहसिलदार यांचे दुरध्वणी क्रमांक

| अ. क्रमांक | नावं | पदनाम | एसटीडी | दुरध्वनी | | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यालय | निवास | |
| 1 | श्री. सचिन शेजाळ | तहसिलदार यवतमाळ | ०७२३२ | २३८१९४ | २४४६५४ | ९७६३६४७७७७ |
| 2 | श्री.रंजीत भोसले | तहसिलदार कळंब | ०७२०१ | २२६१४० | २२६१४१ | ९४२२९१७०३६ |
| 3 | श्री. दिलीप झाडे | तहसिलदार बाभुळगांव | ०७२०३ | २७०५२४ | २७०५४२ | ९४२२९१७०३५ |
| 4 | श्री. सुधीर पवार | तहसिलदार आर्णी | ०७२३४ | २६६६८० | २६६२६० | ९४२२९१७०३७ |
| 5 | श्री. प्रकाश राऊत | तहसिलदार, दारव्हा | ०७२३८ | २५४१५२ | २५४१५५ | ९४२२९१७०३८ |
| 6 | श्री. के.डब्ल्यु.बागडे | तहसिलदार दिग्रस | ०७२३४ | २२२१०३ | २२२१०२ | ९४२२९१७०३९ |
| 7 | श्री. एम.एस.गेडाम | तहसिलदार नेर | ०७२३८ | २६७७६३ | २६७७१६ | ९४२२९१७०४० |
| 8 | श्री.संजय गरकल | तहसिलदार पुसद | ०७२३३ | २४६०३२ | २४६२४२ | ९४२२९१७०४१ |
| 9 | श्री.भगवान कांबळे | तहसिलदार उमरखेड | ०७२३१ | २३७२१७ | २३७२३० | ८९७५३३७७२२ |
| 10 | श्री.एन.जे.इसाळकर | तहसिलदार महागांव | ०७२३६ | २२२२३८ | २२२२३९ | ९४२२१६८६०९ |
| 11 | श्री.महादेव जोरवर | तहसिलदार केळापूर | ०७२३५ | २२७४०८ | २२७५४९ | ८६०५८८४२३३ |
| 12 | श्री.जी.के.हामंद | तहसिलदार घाटंजी | ०७२३० | २२७२०९ | २२७२१० | ९४२१३१६९०६ |
| 13 | श्री. हेमंत गांगुर्डे | तहसिलदार राळेगांव | ०७२०२ | २२५२५४ | २२५२५६ | ९६८९००७४४९ |
| 14 | श्री. रविंद्र जोगी | तहसिलदार वणी | ०७२३९ | २२५०६२ | २२५१५४ | ९४२२९१७०४६ |
| 15 | श्री.विजय साळवे | तहसिलदार मारेगांव | ०७२३७ | २२७२४३ | २३७२३८ | ८२७५३९९५८६ |
| 16 | श्री.गणेश राउुत | तहसिलदार झरीजामणी | ०७२३७ | २३६५०४ | -- | ९४२२६४१८२१ |

## पूर परिस्थितीबाबत पुर्व सुचना व प्रसारण व्यवस्था .. ...

- हवामान खात्याकडून सुचना प्राप्त झाल्यास त्वरीत जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवर सुचना देणे.
- ग्राम पातळीवरील कर्मचाऱ्यास मान्सून काळांत सक्तीने मुख्यालयी ठेवणे.
- जिल्हा / तालुका स्तरावरील नियंत्रण कक्ष अद्यावत / कार्यरत ठेवणे.
- महसूल / पोलीस / पाटबंधारे / आरोग्य खाते / बांधकाम विभाग / विद्युत विभाग / जिल्हा परिषद व प्रसारमाध्यम यांचा योग्य समन्वय ठेवणे.
- नदीकाठावरील गांवात पुरप्रतिबंधक समिती स्थापन करुन त्यांच्या बैठका घेणे, स्थानिक लोकप्रतिनिधींचा व समाजसेवी संस्थाचा सहभाग मिळविणे.
- जिल्हयातील सर्व मोठया व मध्यम प्रकल्पावर बिनतारी यंत्रणा स्थापीत करणे. पत्रकार परिषद आयोजीत करणे.

## अत्यावश्यक सेवांची देखभाल व दुरुस्ती .. ...

- जिल्हातील / तालुक्यातील महत्वाचे विभागामध्ये परस्पर समन्वय ठेवून व तांत्रिकदृष्टया सर्व साधणसामुग्री मान्सूनपूर्व अद्यावत करुन घेणे.
- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
- दूरसंचार निगम (दुरध्वनी / दुरभाष सेवा)
- सार्वजनिक बांधकाम विभाग
- पाटबंधारे विभाग
- महाराष्ट्र राज्य जीवण प्राधिकरण विभाग
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
  वैद्यकीय पथक .. (बैठकी आयोजीत करणे व औषधांचा पुरेसा साठा ठेवणे)

वरील सेवांचा जिल्हास्तरावर तालुका निहाय आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची संपूर्ण माहीती अद्यावत ठेवणे. (पत्ता,दुरध्वनी/भ्रमणध्वनी इ.) तालुकानिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन जिल्हाधिकारी / तहसिल कार्यालयातील नियंत्रण कक्षासोबत संपर्क ठेवणे.

## नुकसानीबाबतचा अहवाल ..

- नैसर्गीक आपत्ती / अतिवृष्टीमुळे नुकसानीचा प्राथमिक अहवाल २४ तासात शासनास पाठविणे आवश्यक आहे.
- पुर किंवा अतिवृष्टीमुळे प्राणहानी किंवा वित्तहानी झाल्यास तातडीने उपाययोजना करण्याकरिता स्थापीत समिती कडून तातडीने अहवाल मागविणे.
- नुकसानीचा प्राथमिक अहवाल राज्य शासनाचे संकेत स्थळावर त्वरीत सादर करणे आवश्यक आहे.
- तलाठी / ग्रामसेवक / कृषीसहाय्यक / पोलीस पाटील / बांधकाम विभाग कर्मचारी यांचे गठीत समितीमार्फत शेती कृषीचे पंचनामे तयार करणे / घर व गुरांचे नुकसानीचे सखोल सर्वेक्षण अहवाल मागविणे व शासनास / जिल्हा / तालुका कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे.

## आपदग्रस्तांचे स्थलांतर व त्याबाबत नियोजन ..

- आणिबाणीच्या परिस्थितीत आपदग्रस्तांचे स्थलांतर करण्यासाठी, तलाठी, ग्रामसेवक, गृहरक्षकदल, पोलीस यांना सुचना देण्यात याव्यांत. ट्रक, टिप्पर व इतर साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा, तालुका स्तरावर नियोजन करावे.
- आपादग्रस्तांसाठी सुरक्षित ठेवण्याची ठिकाणी शोधून त्याची यादी तालुका व ग्राम स्तरावर ठेवण्यांत यावी. व त्यायोगे त्यांना त्या ठिकाणी सुरक्षितरित्या ठेवता येईल. याबाबत तालुका स्तरावर नियोजन करुन कृती आराखडा तयार करण्यात यावा.

## जिवनावश्यक वस्तुंचा साठा व पुरवठा ... ..

- जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय गोदामात पर्जन्यकाळात भरपूर धान्य साठा ठेवावा.
- आणिबाणीची परिस्थिती उद्भवल्यास साठा उपलब्ध करुन देण्यासाठी वाहन व मनुष्यबळाची व्यवस्था जिल्हा व तालुकास्तरावर करुन ठेवावी.
- गहू / तांदुळ व केरोसीन साठा तालुका, गांव स्तरावर उपलब्ध ठेवावा. त्याचे योग्य संनियंत्रण ठेवणे व वाटपात पारदर्शकता ठेवणे याबाबत नियोजन करावे. आवश्यकता भासल्यास फुड पॅकेटचे व्यवस्थेबाबतचे नियोजन करुन ठेवावे.

## औषधी व आरोग्य पथके ... ..

- जिल्हयातील व तालुकास्तरावरील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रावर औषधीचा मुबलक साठा उपलब्ध असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.
- सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना व वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुख्यालयी सक्तीने राहण्याबाबत सुचना देण्यांत याव्यांत.
- प्रत्येक आरोग्य केंद्रावर आरोग्य पथके तयार करण्यात यावीत.
- साथीच्या रोगांवर नियंत्रण व उपाययोजना करण्याबाबत कृती आराखडा तयार करुन ठेवण्यांत यावा.

## पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ... ..

- जिल्हयामध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवण्याबाबत महाराष्ट्र जीवण प्राधिकरण, संबंधित नगर पालीका व आरोग्य विभाग यांना सुचना देण्यांत याव्यांत व आवश्यकता वाटल्यास टँकरने पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कृती आराखडा तयार करावा.
- हँडपंपचे बाजुचा परिसर स्वच्छ ठेवणेबाबतच्या सुचना जिल्हा परिषद / नगर परिषद / गट विकास अधिकारी / ग्रामपंचायत इ. मार्फत देण्यांत येतील.

पिण्याच्या पाण्यामध्ये ब्लिचींग पावडरचा वापर करण्याबाबतच्या सुचना संबंधित यंत्रणा मार्फत द्याव्यांत.

## पशु वैद्यकीय सेवा ... ..

- पुरामुळे किंवा अतिवृष्टीमुळे पशुधनाचे नुकसान झाल्यास जखमी / आजारी जनावरांना योग्य वेळी औषध पुरविणे तसेच पशुधन मृत झाल्यास त्यांचे योग्य वेळी पंचनामे करणे व मृतदेहांची योग्य विल्हेवाट लावणे, इत्यादी करिता पशुवैद्यकीय पथक सज्ज ठेवणे आवश्यक आहे.
- आरोग्याच्या दृष्टीने मृत जनावरी नष्ट करण्यासाठी ग्रामीण पशुवैद्यकीय अधिकारी व त्यांचे यंत्रणेस सुचना देण्यांत याव्यांत.

जनावरांच्या औषधांचा भरपूर साठा तालुका / ग्रामीण स्तरावरील पशुवैद्यकीय केंद्रावर करुन ठेवणे.

## नियंत्रण कक्ष ... ..

- जिल्हास्तरावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करण्यांत आली आहे. तसेच तालुकास्तरावर व नियंत्रण कक्ष स्थापन करण्यांत आलेले असून ते योग्यरित्या कार्यान्वीत ठेवण्यात येतील, याबाबतच्या सुचना देण्यांत आलेल्या आहेत.
- तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यांत आले असून त्यात प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांत येईल.
- मान्सूनमध्ये नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वीत ठेवण्यांत येईल.

## आणिबाणीचे काळातील उपाययोजना ... ..

- जिल्हयाचा  तसेच तालुकयाचा आपतकालीन कृती आराखडा तयार करण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरुन स्थापीत आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक वेळोवेळी घेऊन, जिल्हास्तरावर आढावा घेण्यांत येईल.
- हेलीकॉप्टर व यांत्रिक बोटी बाबत संबंधित अधिकाऱ्यांचे दुरध्वनी संदेशाची माहीती खालील प्रमाणे असून आवश्यकते नुसार त्यांचेकडून मदत घेण्यांत येईल.

नैसर्गीक आपत्तीमुळे नदी / नाल्यांना पुर येऊन नेहमी बाधित होणाऱ्या अतीसंवेदनशील व संवेदनशील गांवांची तालुका निहाय माहीती दर्शविणारे विवरण जिल्हा : यवतमाळ

| तालुक्याचे नांव | अतिसंवेदनशील गांवे | | संवेदनशील गांवे | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ |
| १) वणी | १) | जुगाद | १) | कळमना बु. | |
| | २) | शिवणी | २) | बोरी | |
| | ३) | चिंचोली | ३) | देऊरवाडा | |
| | ४) | साखरा | ४) | कोलगांव | |
| | | | ५) | तेजापूर | |
| | | | ६) | नायगांव | |
| | | | ७) | टाकळी | |
| | | | ८) | चिखली | |
| | | | ९) | मुर्ती | |
| | | | १०) | अहेरी | |
| २) मारेगांव | | निरंक | १) | सावंगी | |
| | | | २) | कोसारा | |
| | | | ३) | चिंचमंडळ | |
| | | | ४) | शिवणी | |
| | | | ५) | केगांव | |
| | | | ६) | दापोरा | |
| | | | ७) | दांडगांव | |
| | | | ८) | आपटी | |
| ३) झरीजामनी | १) | दुर्भा | १) | राजुर | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २) | धानोरा | २) | हिरापूर | |
| | ३) | दिग्रस | ३) | बहीलनपूर | |
| | | | ४) | येडशी | |
| | | | ५) | खातेरा | |
| | | | ६) | वेडद | |
| | | | ७) | वठोली | |
| | | | ८) | दाभा | |
| | | | ९) | सतपल्ली | |
| | | | १०) | अहेरअल्ली | |
| ४) केळापूर | | नि रं क | १) | पांढरकवडा | |
| | | | २) | पिंपरी रोड | |
| | | | ३) | रुढा | |
| | | | ४) | चनाखा | |
| | | | ५) | कोदोरी | |
| ५) राळेगांव | १) | सावंगी पेरका | १) | बोरीसंगम | |
| | | | २) | मेंगापूर | |
| | | | ३) | करंजी (सोनाबाई) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६) घाटंजी | | निरंक | १) | घोटी | |
| | | | २) | सावंगीसंगम | |
| | | | ३) | भिमकुंड | |
| | | | ४) | राजापेठ | |
| | | | ५) | विलायता | |
| ७) यवतमाळ | १) | बोरीगोसावी | १) | मंगरुळ | |
| | | | २) | बेलोरा | |
| | | | ३) | यावली | |
| ८) कळंब | | निरंक | १) | पिलखाना | |
| ९) बाभुळगांव | १) | नांदेसावंगी | १) | मुस्ताबाद | |
| | २) | मांगसावंगी | २) | बाभुळगांव | |
| | | | ३) | वाटखेड | |
| | | | ४) | हस्तापूर | |
| | | | ५) | नांदुरा बु. | |
| | | | ६) | रेणूकापूर | |
| १०) आर्णी | | निरंक | १) | आर्णी | |
| | | | २) | राणीधानोरा | |
| | | | ३) | चिमटा | |
| | | | ४) | आयता | |
| | | | ५) | आर्णी | |
| | | | ६) | कापेश्वर | |
| | | | ७) | खडका | |
| ११) दारव्हा | १) | हातगांव | १) | रामगांव | |
| | २) | फुबगांव | २) | बोदेगांव | |
| | ३) | डोल्हारी | ३) | सांगलवाडी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४) | पेकर्डा | ४) | मानकोपरा | |
| | ५) | गाजीपूर | ५) | बरबडी | |
| | | | ६) | मानकी | |
| | | | ७) | नखेगांव | |
| | | | ८) | शेंद्री | |
| | | | ९) | बोरी खुर्द | |
| | | | १०) | बोरी बु. | |
| | | | ११) | वाघुळ | |
| | | | १२) | वघळ | |
| | | | १३) | साजेगांव | |
| | | | १४) | पिंप्री | |
| | | | १५) | निंभा | |
| | | | १६) | उचेगांव | |
| | | | १७) | वडगांव | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२) दिग्रस | १) | बेलोरा | १) | दिग्रस | |
| | २) | सावंगा खु. | २) | कांदळी | |
| | ३) | मेंढी | ३) | महागांव | |
| | | | ४) | सिंगद | पुनर्वसन पुर्ण |
| १३) नेर | १) | शहापूर | १) | उदापूर | |
| | २) | टाकळी खु. | २) | शेंन्द्री बु. | |
| | | | ३) | वाळकी | |
| १४) पुसद | | नि रं क | १) | वनवारला | |
| | | | २) | येरंडा | |
| | | | ३) | कोपरा खु. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ४) | सावंगी | |
| | | | ५) | वालतूर रे. | |
| | | | ६) | ईटावा | |
| | | | ७) | पुसद | |
| | | | ८) | ईसापूर | |
| | | | ९) | देवगव्हाण | |
| | | | १०) | जगापूर | |
| | | | ११) | गौळ बु. | |
| | | | १२) | गहूली | |
| | | | १३) | चोंढी | |
| | | | १४) | बांन्सी | पुनर्वसन पुर्ण |
| १५) उमरखेड | १) | पळशी | १) | टाकळी खुर्द | |
| | २) | चिंचोली संगम | २) | साखरा | |
| | ३) | देवसरी | ३) | बिटरगांव खु. | |
| | | | ४) | गाजेगांव | |
| | | | ५) | सिंदगी | |
| | | | ६) | बोरी चातारी | |
| | | | ७) | तिवरंग | |
| | | | ८) | चातारी | |
| | | | ९) | पोफाळी | |
| | | | १०) | तिवडी | |
| | | | ११) | खरुस बु. | |
| | | | १२) | मार्लेगांव | |
| | | | १३) | हातोला | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६) महागांव | | नि रं क | १) | मोरथ | |
| | | | २) | वाकोडी | |
| | | | ३) | धारकान्हा | |
| | | | ४) | डोंगरगांव | |
| | | | ५) | जनुना | |
| | | | ६) | करंजखेड | |
| | | | ७) | आनंदनगर | |
| | | | ८) | हिवरा | |
| | | | ९) | कलगांव | |
| | | | १०) | वरोडी | |
| | | | ११) | थार बु. | |
| | | | १२) | कवठा | |
| | | | १३) | संगम | |
| | | | १४) | भोसा | |
| | | | १५) | दहीसावळी | |
| | | | १६) | राहूर | |
| | | | १७) | शिरपूल्ली | |
| | | | १८) | काळी टेंभी | |
| | | | १९) | टेंभी (काळी) | |
| | | | २०) | कासारबेहळ | |
| | | | २१) | धनोडा | |
| | | | २२) | शिरपूर | |
| | | | २३) | खडका | |
| | | | २४) | तिवरंग | |
| | | | २५) | वाकान | |

## गोषवारा

| - | अतिसंवेदनशील गांवांची संख्या | संवेदनशील गांवांची संख्या | एकुण गांवांची संख्या |
|---|---|---|---|
| ए कु ण | २४ गांवे | १३४ गांवे | १५८ गांवे |
| पुर्णवसन पुर्ण | | २ गांवे | २ गांवे |
| | २४ गांवे | १३२ गांवे | १५६ गांवे |

## .. पुर नियंत्रण पूर्वतयारी करावयाच्या कामाची रुपरेषा ..

१) यवतमाळ जिल्हयात पैनगंगा, वर्धा, अरुणावती, बेंबळा आणि अडाण, हया प्रमुख नद्या असून १६ पैकी १३ तालुके या नद्यांच्या पुरेरेषेत येतात. याशिवाय लहान नद्या आणि नाले यांच्यामुळे सुध्दा बऱ्याच तालुक्यांत पुराचा तडाखा बसतो. यवतमाळ जिल्हयात १९५९, १९६२,१९७९,१९८३,१९८४,१९८६,१९८८,१९९०,१९९१ व १९९४, मध्ये महापूर आले होते. व त्यामुळे जिल्हयांतील बऱ्याच गावांना पुराचा तडाख बसला होता. यापूर्वी आलेल्या पुराचा आढावा घेता असे दिसून येते की, महापूर सर्वसाधारणपणे जुलै महिण्यांत आणि ऑगष्ट महीण्याचे पहील्या पंधरवाडयात येतो.

२) पुरनियंत्रण कामाचे पूर्व तयारीचा पहीला आणि महत्वाचा टप्पा म्हणजे संभाव्य पूरग्रस्त आणि पुराचे पाण्याने वेढल्या जाणाऱ्या गावांची यादी तयार करणे, काही गांवे नाल्याचे पाण्याने सुध्दा वेढली जातात. अशा गावांची स्वतंत्र यादी तयार करण्यांत यावी. तसेच या गावांत पोहचण्याकरिता अस्तित्वात असणाऱ्या सर्व मार्गांची माहीती गोळा करुन, अशी गांवे आणि त्या गावांना पोहचण्याकरिता अस्तित्वात असलेले पर्यायी रस्ते एका मोठया नकाशामध्ये विशिष्ट रंगानी दर्शवावे. सदर नकाशाची एक प्रत तहसिल आणि उपविभा ीय अधिकारी कार्यालयात उपलब्ध ठेवून एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात पाठवावी. हे काम १० जुन चे आंत पुर्ण व्हावयास पाहीजे. पर्यायी रस्त्यांचा तपशिल बांधकाम खात्याचे स्थानिक उपअभियंत्यांस सुध्दा

कळवावा, जेणेकरुन संबंधित उपअभियंत्यास सदर रस्त्याचे दुरुस्तीचे काम ताबडतोब करता येईल. अशा रस्त्यांचे दुरुस्तीचे काम १०/६ चे आंत पूर्ण व्हावयास पाहीजे. बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंत्यांनी याची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही विनाविलंब पूर्ण करावी.

संभाव्य पुरग्रस्त आणि पुराचे पाण्याचे वेढल्या जाणाऱ्या गावांची यादी तसेच त्या गावांना पोहचविण्याकरिता उपलब्ध असलेल्या पर्यायी रस्त्यांची माहीती स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टरांना सुध्दा पाठवावी.

३) पुराचे पाण्याने वेढल्या गेलेल्या गावांना बऱ्यांच वेळा बोटीद्वारे वैद्यकीय इतर प्रकारची मदत पोहचवावी लागते. याकरिता तालुक्यांत उपलब्ध असलेल्या गावांची नावांची माहीती सुध्दा उपलब्ध करुन ठेवावी. जेणे करुन विनाविलंब त्याचा उपयोग करता येईल.

बांबुचा तराफा तयार करुन त्यांचा बोटी सारखा उपयोग करतो येतो, याकरिता प्रत्येक तहसिल कार्यालयास साधारणतः १०० बांबुचा साठा तालुका कार्यालयात उपलब्ध ठेवावा. जेणे करुन आवश्यकता भासल्यास त्यापासून तराफा तयार करुन उपयोग करता येईल.

विभागीय वन अधिकाऱ्यांकडून आवश्यक बांबुचा पुरवठा करण्यांत यावा. सदर बांबु पावसाळा संपल्यानंतर संबंधित विभागीय वन अधिकाऱ्यांना परत करण्यांत येईल. बांबुची मोडतोड झाल्यास त्याचे किंमतीचा भरणा वन खात्यास करण्यांत येईल.

सिंचन खात्याचे कार्यकारी अभियंताकडे सुध्दा बोटी उपलब्ध असतात, अशा बोटींची संख्या आणि ठिकाणे संबंधित कार्यकारी अभियंत्याने १० जून चे आंत जिल्हाधिकारी यांना कळवावे.

४) पुर निवारण कामाचा महत्वाचा भाग म्हणजे पुरग्रस्त भागातील लोकांना बाहेर काढून त्यांना तात्पुरता पर्यायी निवारा उपलब्ध करुन देणे, अशा प्रकारे तात्पुरती व्यवस्था साधारणतः शाळेच्या इमारतीत केली जाते. परंतु ज्या गावांना शाळा नाहीत किंवा शाळेची इमारत खुप लहान आहे अशा गावांना इतरत्र व्यवस्था करणे आवश्यक असते. याकरिता पर्यायी इमारतींचा शोध घेऊन त्याबाबतची माहीती सुध्दा तालुका आणि उपविभागीय कार्यालयात उपलब्ध असावयास पाहीजे. ही माहीती गांव पातळीवर काम करणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक आणि पोलीस पाटील यांचेकडे सुध्दा उपलब्ध असावयास पाहीजे. यासंबंधी आवश्यक कार्यवाही दिनांक १० जुन चे आंत पूर्ण करावी.

५) संभाव्य धोक्याचा इशारा देणे तसेच पूर आल्यानंतर त्याबाबतची माहीती तातडीने तहसिलदारांना कळविणे आणि पुरग्रस्तांना तातडीने बाहेर काढून त्यांची इतरत्र व्यवस्थ करणे इत्यादी महत्वाची कामे तलाठी, ग्रामसेवक आणि पोलीस पाटील यांना करावयाची असतात. त्यामुळे संभाव्य पुरग्रस्त आणि पुराने वेढल्या जाणाऱ्या गावांच्या तलाठी, ग्रामसेवक आणि पोलीस पाटील यांची सभा दिनांक १० जुन चे बोलवावी व त्यांना पूरनियंत्रण कामा संबंधित सविस्तर सूचना द्याव्यांत.

६) संभाव्य पुरग्रस्त आणि पुराने वेढल्या जाणाऱ्या गावांना टेलीफोन सेवा उपलब्ध असेल तर तेथील महत्वाचे टेलीफोन / मोबाईल फोन नंबरची नोंद तालुका आणि उपविभागीय कार्यालयात ठेवावी. अशा गावांना टेलीफोन उपलब्ध नसेल तर जवळपास असलेल्या गावांतील टेलीफोन नंबरची नोंद ठेवावी. तलाठी, ग्रामसेवक,पोलीस पाटील आणि पुरनियंत्रण कामा संबंधातील इतर अधिकाऱ्यांना अशा टेलीफोन क्रमांकाची यादी / माहीती पुरवावी. तसेच टेलीफोन धारकांना सुध्दा गरज पडल्यास त्यांचेकडील टेलीफोनची पुर निवारणाचे कामासंबंधात संबंधीत अधिकाऱ्यास / कर्मचाऱ्यास उपयोग करुन देण्याबाबत आगावू सूचना द्याव्यांत. अशा टेलीफोन / मोबाईल क्रमांकाची माहीती जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक १० जुन पावेतो पाठवावी.

७) संभाव्य पुरग्रस्त आणि पुराने वेढल्या जाणाऱ्या गावांना स्वस्त धान्य दुकाने असेल तर तेथे पुरेसा धान्यसाठा ठेवण्याची व्यवस्था करावी व स्वस्त धान्प्य दुकानदारास तशा स्पष्ट सूचना द्याव्यांत. अशा गावांची बऱ्याच दिवसाकरिता संपर्क तुटला जाण्याची शक्यता असेल तर तेथे तात्पुरत्या धान्य गोदामाची व्यवस्था करावी. ज्या गावांना किंवा गांव समुहाकरिता तात्पुरत्या धान्य गोदामाची आवश्यकता असले त्याची नांवे संबंधित उपविभागीय अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिनांक १० जुन चे आंत कळवावी व पुढील व्यवस्था १० जुन चे आंत पुर्ण करावी.

अशा गावांना स्वस्त धान्य दुकान नसेल आणि त्या गांवात स्वस्त धान्य दुकान आहे त्या गावांपासून पुरामुळे अशा गावांचा संबंध तुटत असेल तर अशा संभाव्य पुरग्रस्त गावांना सुध्दा तात्पुरते स्वस्त धान्य दुकान उघडण्याची व्यवस्था दिनांक १० जुन चे आंत पुर्ण करावी व अशाही गावांची माहीती संबंधित उपविभागीय अध्किारी आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिनांक १० जुन चे आंत पाठवावी.

पुराचे पाण्याने वेढल्या जाणाऱ्या गावांचे परिसरात असलेल्या शासकीय गोदामात पुरेसा धान्य साठा ठेवण्याबाबत आवश्यक कार्यवाही पुर्ण करावी व तसा पुर्तता अहवाल जिल्हाध्किारी यांना १० जुन पावेतो सादर करावा.

८) प्रत्येक तालुका उपविभागीय अधिकारी कार्यालयात पूर नियंत्रण कक्ष तयार करावा. पूर नियंत्रण कक्ष प्रमुख म्हणून निवासी नायब तहसिलदारांची नियुक्ती करावी त्यांचे मदती करिता एक अव्वल कारकुन व एक कनिष्ठ लिपीक एक शिपाई व एक टंकलेखक यांची नियुक्ती करावी. पुरनियंत्रण कक्षांत काम करणाऱ्या लोकांना तहसिलदाराचे खोलीतच बसण्यांस सांगावे, जेणेकरुन त्यांना टेलीफोनवरुन वेळोवेळी माहीती घेणे व पुरविणे शक्य होईल. अशाच प्रकारचे पुरनियंत्रण कक्ष उपविभागीय कार्यालयात सुध्दा तयार करावे. तालुका कार्यालयातील आणि उपविभागीय कार्यालयातील पुरनियंत्रण कक्षांत काम करणाऱ्या व्यक्तींची नांवे आणि पदनाम जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक १० जून पावेतो कळवावी.

जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरनियंत्रण कक्षाचे प्रमुख म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी हे काम पाहतील व त्यांचे मदतीस एक तहसिलदार, जि.कार्या., दोन अव्वल कारकुन, एक टंकलेखक, एक शिपाई राहतील. परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी व तहसिलदार हे सुध्दा पूर नियंत्रण कक्षांत काम करतील.

वेगवेगळया खात्याचे जिल्हा प्रमुख सुध्दा त्यांचे कार्यालयात एका अधिकाऱ्याची पुर नियंत्रण कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती करतील व त्यांची नांवे / पदनाम व टेलीफोन नंबर / मोबाईल नंबर दिनांक १० जुन चे आंत जिल्हाधिकारी कार्यालास कळवतील.

९) तालुका पातळीवर काम करणाऱ्या वेगवेगळया खात्याचे अधिकारी यांचेकडे असणाऱ्या वाहनांची मागणी केल्यास ताबडतोब तहसिलदारांचे स्वाधिन करतील. याबाबत कोणतीही टाळाटाळ किंवा दिंगाई करता येणार नाही. अन्यथा या बाबींची गंभीर दखल घेतली जाईल. वेगवेगळया खात्याचे जिल्हा प्रमुखांनी सुध्दा त्यांचे तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यांत व तसे जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक १० जुन पावेतो कळवावे.

१०) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी संभाव्य पुरग्रस्त भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राना भेटी देऊन तेथे आवश्यक त्या सर्व औषधांची पुरेशा प्रमाणांत साठा उपलब्ध आहे याची खात्री करुन ध्यावी. तो नसल्यास पुरेसा साठा ताबडतोब उपलब्ध करुन घ्यावा.

पूर आल्याची माहीती मिळतात प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टरांना आपले वैद्यकीय पथकाने संबंधित पुरग्रस्त भागात ताबडतोब भेट द्यावी व तेथील सार्वजनिक स्वच्छता, पिण्याचे पाण्याची व्यवस्था अणि साथीचे रोग उद्‌भवण्याची शक्यता याबाबत पाहणी करुन पुढील कार्यवाही करावी. पिण्याचे पाण्याची निर्जतुकीकरण करणे साथीचे रोग प्रतिबंधक लस टोचणे इत्यादी बाबीकडे बिनाविलंब लक्ष द्यावे. साथीचे रोगाची लागन झाल्याचे आढळून येताच त्याबाबत जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांना ताबडतोब आवश्यक ती माहीती पुरवावी.

११) सर्व विभागीय वन अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे असलेल्या बल्ल्या आणि बांबुचे साठयातून ५००० बल्ल्या आणि १०००० बांबु पूर निवारणाचे कामाकरिता राखून ठेवावे. तहसिलदार कडून मागणी असल्यास तातडीने आवश्यक तेवढया बल्यांचा आणि बांबुचा पुरवठा करावा. बऱ्याच वेळी मॅनेजर विभागीय वन अधिकाऱ्यांचे पूर्व परवानगी शिवाय बल्याची किंवा बांबुचा पुरवठा करण्यांस नकार देतात, त्यामुळे वाहतूकीस विलंब होतो. या करिता सर्व विभागीय वन अधिकाऱ्यांनी त्यांचे सर्व डेपो मॅनेजरांना स्पष्ट सूचना द्याव्यांत.

१२) पुरग्रस्तांना पुरवावयाच्या टिन पत्र्यांचा पुरवठा जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत केला जाईल. या करिता संबंधित तहसिलदारांनी त्यांना आवश्यक असलेल्या टिनपत्र्यांची मागणी तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावी.

१३) जिल्हयातून वाहणाऱ्या प्रमुख नद्या अकोला आणि अमरावती जिल्हयातून वाहत येतात. त्यामुळे अकोला किंवा अमरावती जिल्हयात अतिवृष्टी झाल्यास त्याचा परिणाम सदर नद्यांना पुर येण्यास होऊ शकतो. याकरिता पैनगंगा, वर्धा अरुणावती, अडाण आणि बेंबळा या नद्यांचे वरील भागातील परिस्थितीचा दैनंदीन आढावा घेणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता, प्रकल्प अन्वेषन विभाग, अमरावती यांना याबाबत अकोला आणि

अमरावती जिल्हयातील संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क ठेवावा व पाऊस आणि नद्यांतील पाण्याची पातळी याबाबत आवश्यक माहिती दररोज दुपारी ४.३० वाजेपावेतो जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावी.

अतिवृष्टी आणि महापुराबाबतची शक्यता हवामान खात्याकडून सुध्दा कळविली जाते. ही माहिती नंतर संबंधित तहसिलदारांनी संभाव्य पुरग्रस्त गावांना तातडीने पोहचविण्याची व्यवस्था, संभाव्य पुरग्रस्त गावांतील लोकांना रेडीओवरुन अतिवृष्टी काळात घेण्याविषयी सूचित करावे. वरिष्ठ कार्यालयाकडून अशा प्रकारची सूचना जरी प्राप्त झाली नाही तरी स्थानिक परिस्थितीचा विचार करन तहसिलदारांना संभाव्य पुरग्रस्त गावांना धोक्याचा इशारा देण्याची तातडीने व्यवस्था करावी.

१४) गावांना पुराचा तडाखा बसल्याची माहीती तातडीने संबंधित तहसिलदारांना कळवावयास पाहीजे, ही जबाबदारी त्या गावचे तलाठी, पोलीस पाटील आणि ग्रामसेवक यांची आहे. अशी माहीती मिळताच संबंधित तहसिलदारांनी ती तातडीने (फोनद्वारे / बिनतारी संदेशाद्वारे) जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावी. कोणत्याही परिस्थितीत या बाबतची माहीती पुराचा तडाखा बसण्याचे वेळेपासून १२ तासाचे आंत जिल्हाधिकारी कार्यालयास मिळावयास पाहीजे.

त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील पूर नियंत्रण कक्ष ही माहीती बिनतारी संदेशाद्वारे / फॅक्स द्वारे मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती आणि शासनाचे महसूल विभागास कळवितील. वर नमुद केलेला अहवाल प्राथमिक स्वरुपाचा राहील. नुकसानीचा सविस्तर तपशिल त्यात राहणार नाही. तरीपण नुकसानीचे स्वरुपमात्र प्राथमिक अहवालात नमूद करावयास पाहीजे.

झालेल्या नुकसानीचा आणि देण्यात आलेल्या मदतीचा सविस्तर अहवाल शक्यतो एक आठवडयाचे आंत जिल्हाधिकारी यांना पाठवावयास पाहीजे. नैसर्गीक आपत्तीचे संबंधित सर्व अहवाल, विशेषतः आठवडी अहवाल, प्रत्येक आठवडयाला संपणाऱ्या शुक्रवारला विशेष दुतामार्फत जिल्हाधिकारी यांना वेळेच्या आंत पाठवावे. असे अहवाल पोष्टामार्फत पाठवू नयेत. तसेच अहवालाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, नैसर्गीक आपत्ती विभागास किंवा पुरनियंत्रण कक्षांत काम करणाऱ्या अधिकाऱ्यास द्यावी. इतरत्र कोठेही देऊ नये. जिल्हा प्रमुखांनी सुध्दा त्यांचे अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, नैसर्गीग आपत्ती / नियंत्रण कक्ष विभागास मिळेल या दृष्टीने आवश्यक सूचना सर्व संबंधितांना द्याव्यांत.

१५) नैसर्गीक आपत्तीची माहीती मिळतात तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकाऱ्यांनी तातडीने संबंधित गावांस भेट द्यावी. तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी मुख्यालयी हजर नसल्यास त्या भागाचे नायब तहसिलदार यांनी आपदग्रस्त भागास भेट द्यावी.

१६) अतिवृष्टी आणि महापुरामुळे जमा झालेले अतिरिक्त पाणी धरणांत समावून घेणे शक्य नसेल व त्यामुळे धरणाचे सुरक्षिततेला धोका निर्माण होत असेल तर धरणाचे दरवाजे उघडून पाणी नदीत सोडल्या जाते व त्यामुळे नदीचे पाण्याची पातळी वाढून नदीस पुर येतो. याकरिता संबंधित प्रकल्प अभियंत्यांना धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वी पूर्व सूचना कमीत कमी २४ तास अगोदर संबंधित तहसिलदारांना आणि जिल्हाधिकाऱ्यांना द्यावी. तसेच अशा सुचना त्या नदीचे काठावर असलेल्या सर्व गावांना सुध्दा पाठवावी, व सूचना मिळाल्याची खात्री करुन घेतल्यावरच धरणाचे दरवाजे उघडावेत. शक्यतो कमीत कमी दरवाजे उघडावे जेणे करुन नदीचे पाण्याची पातळी धोक्याचे रेषेत राहील.

१७) अतिवृष्टी आणि महापुरामुळे बऱ्याच वेळा टेलीफोन सेवा विस्कळीत होऊन निरुपयोगी बनते अशा परिस्थितीत बिनतारी संदेशाद्वारे माहीती पाठविणे आवश्यक असते. जवळ जवळ सर्वच पोलीस स्टेशनमध्ये बिनतारी संदेशाची व्यवस्था आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी सर्व पोलीस ठाणे प्रमुखांना नैसर्गीक आपत्ती संबंधातील अहवाल बिनतारी संदेशाद्वारे तातडीने पाठविण्याबाबत सुचना द्याव्यांत.

१८) आपदग्रस्त झालेल्या प्रत्येक गांवाकरिता गांव पातळीवरील निवारण कक्ष तयार करावा. याममध्ये प्रमुख नायब तहसिलदार किंवा वरीष्ठ अव्वल कारकुन असावा. सदर चमुत तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच किंवा सरपंचाने विहीत केलेला ग्रामपंचायत सदस्य आणि कोतवाल यांचा समावेश असावा. पांच ते सहा गावांकरिता एका कनिष्ठ अभियंताची नियुक्ती करावी. बांधकाम खात्याचे अभियंत्याची नेमणूक करुन त्यांची नांवे संबंधित तहसिलदारांना कळवावी.

१९) वेगवेगळया खात्यांची जिल्हा प्रमुखांना त्यांचे खात्याचे अखत्यारीतील सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानीचा सविस्तर तपशिल (तालुका निहाय) शक्यतो १५ दिवसाचे आंत जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावा.

२०) नैसर्गीक आपत्ती निवारण कामाचा कालबध्द कार्यक्रम पुढील प्रमाणे असावा.

| | | |
|---|---|---|
| १) आपदग्रस्त लोकांना पर्यायी निवारा देणे व त्यांची व्यवस्था करणे | : | ताबडतोब |
| २) झालेल्या नुकसानीचा सर्वे आणि पंचनामा करणे .. | : | १ दिवसाचे आंत. |
| ३) निराधार झालेल्या कुटूंबांना कॅशडिलचे वाटप करणे .. | : | २ दिवसाचे आंत. |
| ४) पडलेल्या घरांचे नुकसानीचा सर्वे करुन अहवाल सादर करणे (कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती) | : | ७ दिवसाचे आंत. |
| ५) घर दुरुस्ती/पुर्नबांधणी करिता अनुदान / कर्ज वाटप | : | १५ दिवसाचे आंत. |

(निळया पट्टयातील घरे सोडून)

| | |
|---|---|
| ६) लाल आणि निळया पट्टयाचा सर्वे करणे.. : (कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, व कार्यकारी अभियंता यवतमाळ मध्यम प्रकल्प विभाग, यवतमाळ) | ३ आठवडयाचे आंत. |
| ७) शेतजमीन आणि पिकांचे नुकसानीचा सर्वे .. ... : (तलाठी, ग्रामसेवक, मृदसंधारण खात्याचे अधिकारी आणि कृषी सहाय्यक यांनी संयुक्तपणे करणे) | ३ आठवडयाचे आंत. |
| ८) तहसिलदार, नायब तहसिलदार, गट विकास अधिकारी, : विस्तार अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत तलाठी, ग्रामसेवक यांनी केलेल्या सर्वेची फेरतपासणी | ४ आठवडयाचे आंत |
| ९) बियाणे आणि जमीन दुरुस्ती अनुदानाचे वाटप करणे : (गट विकास अधिकाऱ्या मार्फत ) | ४ ते ६ आठवडयाचे आंत |
| १०) रस्ते, पुल, विद्युत लाईन इत्यादी प्रकारचे दळणवळण : साधणांचे नुकसान झालेले असल्यास त्याची तात्पुरती दुरुस्ती करुन दळणवळण सुरु करणे. | १ आठवडयाचे आंत |
| ११) निळया पट्यात येणाऱ्या गांवाचे पुनर्वसनाबाबत कार्यवाही : | ४ ते ६ आठवडयाचे आंत सुरु करणे |

## आपतकालीन व्यवस्था संपर्काकरिता दुरध्वनी क्रमांक

| नियंत्रण कक्ष मंत्रालय, मुंबई | |
|---|---|
| | ०२२२२०२७९९० |
| | ०२२२२८२८१६९ |
| फॅक्स नंबर | ०२२२२०२६७१२ |

## नियंत्रण कक्ष आयुक्त कार्यालय, अमरावती

| ०७२१-२६६२९४७ | |
|---|---|
| उपआयुक्त (महसूल) | ०७२१ २६६२९४७ (कार्यालय) |
| | ०७२१ २६६१३६४ (निवास) |
| | ९४०३८४२२८८ (भ्रमणध्वनी) |
| फॅक्स नंबर | ०७२१ २६६२७८२ |

## जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

| ०७२३२- २५७०७७/२४०७२० टोल फ्री क्रमांक- १०७७ | |
|---|---|
| निवासी उपजिल्हाधिकारी यवतमाळ | ०७२३२ २४२४८८ (कार्यालय) |
| | ०७२३२ २४४२५० (निवास) |
| | ९४२२९१७०११ (भ्रमणध्वनी) |
| फॅक्स नंबर | ०७२३२- २४२२११ |

| | |
|---|---|
| NDRF नियंत्रण कक्ष<br>तळेगांव पुणे | ०२११४२३१५०९ |

## पुरनियंत्रण पुर्व तयारी करावयाची कामाची रुपरेषा

| | | |
|---|---|---|
| १ | तहसिल कार्यालयात १ जुन पासुन पुरनियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणाऱ्याच्या दृष्टीने पूर नियंत्रण कक्ष उघडला काय ? | |
| २ | उघडल्यास कक्षात काम करणारे अधिकारी / कर्मचारी व दुरध्वनी क्रमांक कळवावा. | |
| ३ | आपण पुर परिस्थिती हाताळण्यास सज्ज आहे का ? आपण तालुक्यात पूर नियंत्रण पूर्वतयारी बाबत सभा घेतली का ? असल्यास सभेचे इतिवृत्त सादर करावे. | |
| ४ | आपण प्रत्येक गांवात पूर नियंत्रण समिती स्थापण केली आहे का ? | |
| ५ | आपण नदी काठावरील गावांची यादी सादर केली आहे का ? असल्यास नदी निहाय गावांची यादी सादर करावी. | |
| ६ | तालुक्यातील कोणत्या नदीच्या पुरामुळे कोणत्या गावाला वेढा पडतो ? व त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे दृष्टीने करावयाची उपाययोजना (गावनिहाय माहिती सादर करावी) | |
| ७ | पुरपिडित गावांतील स्वस्त धान्य दुकान अन्नधान्याचा पुरेसा साठा ठेवण्यात आलेला आहे का ? | |
| ८ | आपण नदी निहाय पूरपिडित गावांचा तालुका नकाशा तयार केला आहे का ? | |
| ९ | असल्यास तालुका नकाशात गांवे, नद्या, पुरपिडित गांव, रस्ते ई. सर्व दर्शवुन नकाशा जिल्हाधिकाऱ्यास सादर करावा. | |
| १० | आपल्या तालुक्यात खाजगी / शासकिय होडया उपलब्ध आहे का ? | |
| ११ | असल्यास कोठे व किती होडया उपलब्ध आहेत. यादी सादर करावी. | |
| १२ | होडया सुस्थितीत आहे का ? | |
| १३ | पूरपिडित गावांत दुरध्वनी / पि.सी.ओ. आहे का ? | |
| १४ | असल्यास दुरध्वनी क्रमांक (गांवनिहाय) कळवावा | |
| १५ | आपले तालुका क्षेत्रात उत्तम पोहणारे व्यक्ती आहे का ? | |
| १६ | आसल्यास त्यांची नांवानिशी यादी आपले कार्यालयास ठेवली आहे का ? | |
| १७ | आपले तालुक्यातील सेवाभावी संस्थांची यादी तयार केली आहे का ? | |
| १८ | सार्वजनिक मालमत्तेचे पुरात नुकसान झाल्यास त्याची माहिती तहसिलदारांना १४ तासात द्यावी म्हणुन सर्व खातेप्रमुखांना कळविले आहे का ? | |
| १९ | संभाव्य पुरग्रस्त गांवातील अतिक्रमकाची यादी तयार केली आहे का ? (प्रत सोबत जोडावी) | |
| २० | अतिक्रमीक नेहमीच्या पूर रेषेच्या आत राहतात का ? | |
| २१ | राहत असल्यास त्यांची यादी तयार केली काय? | |
| २२ | संभाव्य पुरग्रस्त गांवातील व्यक्ती बाहेर राहण्यास गेल्याने रिकामी झालेल्या/ इतरांचे ताब्यात असलेल्या घरांची यादी तयार केली काय ? | |
| २३ | यापुर्विचे पुराने बाधित होऊन मदत स्विकारलेल्या लोकांची यादी तयार केली काय? (असल्यास प्रत सोबत जोडावी) | |